जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १९७ दिनांक - ३०/०३/२०२४**

सहकारनगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## पिस्टल व जिवंत काडतुस जवळ बाळगणा-या सराईत गुन्हेगारास केले जेरबंद

दि.२९/०३/२०२४ रोजी सहकारनगर पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे पोलीस स्टेशन हद्दीत गुन्हयांना प्रतिबंध घालण्याचे अनुषंगाने पेट्रोलींग करीत तीन हत्ती चौकात आले असताना **पोलीस अंमलदार अमोल पवार** यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहीती मिळाली की,एक मुलगा तिरुपतीनगर चौक तळजाई पठार धनकवडी पुणे या ठिकाणी रोडवर कोणाची तरी वाट पाहत थांबला असुन त्याचे कंबरेला पिस्टल सारखे हत्यार लावलेले आहे व तो संशयरित्या उभा आहे अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सहकारनगर पोलीस स्टेशन कडिल वरिष्ठ पालीस निरीक्षक सुरेंद्र माळाळे यांना कळविली असता त्यांनी लागलीच सपोनि छबु बेरड व अंमलदार यांची टीम तयार करुन त्यांना सुचना व मार्गदर्शन करून बातमीचे ठिकाणी जावुन कारवाई करण्याचे तोंडी आदेश दिले

त्यानुसार सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी बातमीचे ठिकाणी जावुन छापा टाकुन आरोपीस ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव **वैभव ऊर्फ संयम प्रकाश कटारीया वय १९ वर्षे रा.साईली ईन एरीया चैतन्य नगर एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे** असे असल्याचे सांगीतले.त्याची स्टाफचे मदतीने पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे पॅन्टमध्ये खोचलेले एक गावठी बनावटीचे पिस्टल मॅगझीनसह व ०१ जिवंत काडतुस मिळुन आल्याने सदरचा ५१,०००/- रु किमतीचा माल पंचा समक्ष जप्त करुन त्याचेविरुध्द सहकारनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ९५/२०२४ आर्म ॲक्ट क ३(२५) व महा.पो.अधि. क ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर आरोपी याने सदरचे पिस्टल जवळ बाळगण्याचा मुख्य उद्देश काय आहे या बाबत अधिक तपास करता त्याने सांगितले सुमारे २ वर्षा पुर्वी आरोपीने एकाचा खुनाचा प्रयत्न केला होता त्याच्या पासुन जिवाला भिती असल्याने सदरचे पिस्टल ठेवले होते अशी माहिती पोलीसांना दिली आहे.सदर आरोपीवर २ खुनाच्या प्रयत्नाचे, १ मारामारीचा असे एकुण ३ गुन्हे बारामती तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत.

सदरची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग नंदिनी वग्यानी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पो.स्टे. श्री.सुरेंद्र माळाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) उत्तम भजनावळे यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे सहा पोलीस निरीक्षक छबु बेरड,सहा.पोउपनिरी बापु खुटवड,पोलीस अंमलदार अमोल पवार,किरण कांबळे,बजरंग पवार,महेश मंडलिक,नवनाथ शिंदे,सागर कुंभार,अमित पदमाळे,संजय गायकवाड,निलेश शिवतारे,सागर सुतकर,विशाल वाघ यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
सद्‌रक्षणाय खलनिग्रहणाय
सहकारनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर